आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

३ जुलै २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशाची राज्यघटना प्रत्येक सरकारसाठी दीपस्तंभासारखी मार्गदर्शक असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं राज्यसभेत प्रतिपादन

- कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रती हेक्टरी पाच हजार रुपये मदतीची पणन मंत्री अब्दुल सत्तार यांची विधानसभेत घोषणा

- कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून तंत्रज्ञानाचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचवणं भारताचा दृष्टिकोन असल्याचं केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांचं जागतिक कृत्रिम बुद्धिमत्ता परिषदेत प्रतिपादन

**आणि**

- शेअर बाजार निर्देशांकानं व्यवहाराच्या सुरूवातीला ओलांडली ८० हजारांची उच्चांकी पातळी

**<><><><><>**

भारताची राज्यघटना ही प्रत्येक सरकारसाठी दीपस्तंभासारखीच मार्गदर्शिका असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रस्तावावरल्या  चर्चेला उत्तर देताना बोलत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या राज्यघटनेमुळेच शून्य राजकीय वारसा असलेल्या व्यक्तिला राजकारणात येण्याची आणि इतक्या मोठ्या पदावर पोहचण्याची संधी मिळाली, असंही ते म्हणाले.

देशातल्या जनतेनं गेल्या १० वर्षांमधल्या आमच्या देशसेवेच्या प्रयत्नांना पाठबळ आणि आशीर्वाद दिला, आम्ही देशाच्या अर्थव्यवस्थेला जगातली तिसऱ्या

क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनवू शकतो, यावर त्यांचा ठाम विश्वास होता, त्यामुळेच जनतेनं सलग तिसऱ्यांदा आमचं सरकार निवडून दिलं, असं ते म्हणाले.

**दरम्यान** प्रधानमंत्र्यांचं भाषण सुरू असतानाच, काँग्रेस, द्रमुक, तृणमूल काँग्रेस, आम आदमी पार्टीसह विरोधी पक्षांनी हौद्यात येत गोंधळ घातला. सभागृहाचे अध्यक्ष जगदीप धनखड यांनी त्यांना जागेवर बसायला सांगूनही गोंधळ सरू ठेवत अखेरीस सभात्याग केला.

**<><><><><>**

राज्यसभेचं आजचं कामकाज सुरू झाल्यानंतर उत्तर प्रदेशात हाथरस इथं झालेल्या दुर्घटनेतल्या मृतांना आदरांजली वाहण्यात आली. या घटनेतील जखमींना वैद्यकीय मदत देण्यासाठी आवश्यक पावलं उचलली जात आहेत, या प्रकरणाच्या चौकशीसाठी समिती स्थापन केली आहे, अशी माहिती राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांनी दिली.

अशा घटना रोखण्यासाठी विशेष कायदा करावा, अशी सूचना राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी आपल्या निवेदनात केली. त्याआधी सभागृहात माजी दिवंगत सदस्यांनाही आदरांजली वाहण्यात आली.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशातल्या हाथरस जिल्ह्यातल्या फुलराई गावात सत्संगादरम्यान चेंगराचेंगरीमुळे झालेल्या दुर्घटनेत आतापर्यंत १२१ लोकांचा मृत्यू झाला आहे. २८ जण गंभीर जखमी असून त्यांच्यावर आगरा, अलिगढ आणि हाथरसमध्ये विविध रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आज घटनास्थळाला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. तसंच हाथरस जिल्हा रुग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस केली. उत्तर प्रदेश पोलिसांनी हा सत्संग आयोजित करणाऱ्या

स्वयंघोषित आध्यात्मिक बाबाच्या शोधासाठी मैनपुरी जिल्ह्यातल्या राम कुटीर चॅरिटेबल ट्रस्टवर काल रात्री छापे टाकले.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रती हेक्टरी पाच हजार रुपये मदत देण्याची घोषणा पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात केली. यावर्षी लांब धाग्याच्या कापसाची सरकारी खरेदी केंद्र सरकारने नमूद केलेल्या नव्या दरानं होईल, असं त्यांनी सांगितलं. हरीश पिंपळे यांनी याबाबत प्रश्न विचारला होता.

पुण्यातील कात्रज इथं उभारल्या जाणाऱ्या उड्डाण पुलासाठी भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करून हे कामही जानेवारी २०२५ पर्यंत पूर्ण केलं जाईल, असं सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी भीमराव तापकीर यांच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं.

दरम्यान सकाळी कामकाज सुरू होण्याआधी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी भ्रटाचाराच्या मुद्यावरून विधान भवनाच्या पायऱ्यांवर जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन केलं.

**<><><><><>**

**अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलडाणा आणि वाशीम** जिल्ह्यातल्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विविध थकीत देयकं अदा करण्यासाठी विशेष शिबिरं घेण्याची घोषणा शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी आज विधानपरिषदेत केली. किरण सरनाईक यांच्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना ते बोलत होते.

आक्षेपार्ह शब्दांच्या वापराबद्दल निलंबित झालेले सभागृतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी माफी मागितली आहे, त्यामुळे त्यांच्या निलंबनाचा फेरविचार

करावा अशी मागणी, अनिल परब यांनी प्रश्नोत्तराच्या तासात उपसभापती निलम गोऱ्हे यांच्याकडे केली. त्यावर प्रश्नोत्तराच्या तासानंतर चर्चा करून याबाबतचा निर्णय घेऊ, असं गोऱ्हे यांनी सांगितलं.

डोंबिवली इथल्या कारखान्यातील स्फोट, पीडितांना मदत आणि कारखान्यांद्वारे होणाऱ्या प्रदुषणाचा मुद्दा आमदार उमा खापरे यांनी मांडला. त्याला मंत्री दीपक केसरकर यांनी उत्तर दिलं. १३ कामगारांपैकी ११ जणांचा विमा काढलेला असून उर्वरित दोघांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ५ लाख रुपये दिले आहेत, प्रदूषणाच्या मुद्द्यासाठी सुधीर श्रीवास्तव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षमतेचा वापर करून तंत्रज्ञानाचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचवणं, हा भारताचा दृष्टिकोन असल्याचं केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. वैष्णव यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत भारत जागतिक कृत्रिम बुद्धिमत्ता परिषदेला प्रारंभ झाला, त्यावेळी ते बोलत होते. केंद्र सरकार लवकरच भारत ए आय मोहीम सुरु करणार असून त्यासाठी १० हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे, असं त्यांनी सांगितलं. याशिवाय एक ए आय नवोन्मेष केंद्र देखील स्थापन केलं जाईल, ज्यामुळे उच्च दर्जाचे डेटा संच उपलब्ध होतील आणि त्याचा फायदा स्टार्ट अप्स आणि संशोधकांना होऊ शकेल, असं ते म्हणाले. कृत्रिम बुद्धिमत्तेचा गैरवापर होऊ नये यासाठी त्यावर नियंत्रण ठेवण्याकरता केंद्र सरकार एक कायदा तयार करत आहे, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

भारताच्या पहिल्या सौर मोहिमेअंतर्गत प्रक्षेपित केलेल्या आदित्य एल वन यानानं अंतराळात पृथ्वी आणि सूर्य यांच्यातल्या लॅग्रेंज पॉइंट एल वन इथं आपली

पहिली प्रभामंडळ प्रदक्षिणा पूर्ण केली आहे. आदित्य एल वन नं आपल्या दुसऱ्या प्रभामंडळ कक्षेतलं स्थानांतरण यशस्वीरीत्या केल्याचं भारतीय अंतराळ संशोधन संस्था, इस्रोनं सांगितलं. आदित्य-एल वन ही एक अवकाश वेधशाळा असून सूर्याचा अभ्यास करण्यासाठी भारतानं आखलेली ही पहिली सौर मोहीम आहे.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकानं आज व्यवहार सुरु होतानाच जोरदार उसळी घेत विक्रमी ८० हजारांचा टप्पा पार केला. शेअर बाजाराची ही आतापर्यंतची उच्चांकी पातळी आहे. सेंसेक्स ५७२ पूर्णांक ३२ अंकांच्या वाढीसह ८० हजार १३ अंकांवर उघडला तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी देखील १६७ अंकांच्या वाढीसह २४ हजार २९१ पूर्णांक ७५ अंकांवर उघडला.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या नीती आयोगानं राबवलेल्या संपूर्णता अभियानाला आज महाराष्ट्रातल्या **नांदेड** इथं सुरुवात होत आहे. तर **धाराशिव** जिल्ह्यातल्या परंडा तालुक्यात उद्या या अभियानाला सुरुवात होणार आहे. या अभियानात देशातल्या ५००तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. या अभियानामार्फत जुलै ते सप्टेंबर या कालावधीत गरोदर मातांची तपासणी, उच्च रक्तदाब आणि मधुमेह तपासणी, गरोदर मातांना पोषण आहार, मृदा आरोग्य पत्रिका आणि स्वयंसहाय्यता गटांना खेळतं भांडवल देण्यात येणार आहे.

महाराष्ट्रात **अमरावती, बीड, चंद्रपूर, गडचिरोली, नांदेड, जालना, नंदुरबार, हिंगोली, नाशिक, धाराशिव, पालघर, सोलापूर, वाशिम,वर्धा** आणि **यवतमाळ** या जिल्ह्यांचा या अभियानात समावेश झाला आहे.

**<><><><><>**

छत्तीसगडमध्ये सुरक्षा दलांशी काल झालेल्या चकमकीत नारायणपूर जिल्ह्यात पाच माओवादी ठार झाले. महाराष्ट्राच्या सीमेलगत असलेल्या सुरक्षा

कर्मचाऱ्यांवर माओवाद्यांनी हल्ला करत बेछूट गोळीबार केला. सुरक्षा दलांनी प्रत्युत्तरादाखल केलेल्या गोळीबारात पाच माओवादी ठार झाले. दरम्यान, सुरक्षा दलांनी राज्यातल्या सुकमा जिल्ह्यातल्या विविध भागातून नऊ माओवाद्यांना अटक केली, तर सुकमा जिल्ह्यात एका महिलेसह दोन माओवाद्यांनी शरणागती पत्करली आहे.

<><><><><>

नैऋत्य मान्सून देशभरात दाखल झाला असून तो आता राजस्थान, हरयाणा आणि पंजाबच्या उर्वरित भागांमध्ये पुढे सरकला आहे, अशी माहिती भारतीय हवामान विभागानं दिली आहे. या राज्यात ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल. पुढील चार दिवसांत देशाच्या वायव्य आणि मध्य भागात पावसाची शक्यता आहे.

पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश, दिल्ली, उत्तरप्रदेश, राजस्थान,उत्तराखंड आणि गुजरातमध्ये आज जोरदार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

//<><><><><>//

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
३ जुलै २०२४ - बुधवार